महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ◆ २८ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०९६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

### दुरुस्तीच्या कामासाठी

## शहाड उड्डाण पूल राहणार बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण शहरातील शहाड येथील उड्डाण पुलाच्या देखभाल दुरुस्ती, मजबुतीकरण आणि बेअरिंग बदलण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून २८ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत केले जाणार आहे. या महत्वपूर्ण कामासाठी शहाड येथील उड्डाण पूल सर्व प्रकारच्या वाहनांसाठी १५ दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. या पुलावरून धावणाऱ्या कल्याण-माळशेजमार्गे नगर आणि इतर सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी पर्यायी रस्ते मार्गाने वाहतूक करावी, अशी अधिसूचना वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी काढली आहे.

शहाड येथील उड्डाण पुलावर खूप खड्डे पडले आहेत. पुलाचे सांधे जोड खराब झाल्याने पावसाचे पाणी त्यात मुरून पुलाला गळती लागली आहे. पुलावरील रस्ता सुस्थितीत नसल्याने पुलावर दररोज वाहतूक कोंडी असते. कल्याणहून मुरबाडमार्गे माळशेज, अहिल्यानगर, जुन्नर भागात जाणारी आणि येणारी वाहतूक या पुलावरून होते. कल्याण तालुक्यातील म्हारळ ते मुरबाड तालुका हद्दीतील गावांमधील नोकरदार, व्यावसायिक, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीत जुन्नर, आळेफाटा भागातून भाजीपाला, फळे घेऊन येणारी वाहने याच पुलावरून धावतात.

**प्रवेश बंद व पर्यायी मार्ग**

मुरबाड, माळशेज घाटाकडून शहाड उड्डाण पुलाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बारवी डॅम फाटा, मुरबाड येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही सर्व वाहने बारवी डॅम फाटा येथून बदलापूर रस्त्याने बदलापूर, पालेगाव, नेवाळी नाका, मलंग गड रस्ता, लोढा पलावा, शीळ डायघर, किंवा पत्रीपूल येथून इच्छित स्थळी जातील. मुरबाड तालुक्यातून शहाड पुलाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दहागाव फाटा (रायता गाव) येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने रायतागाव येथे डावे वळण घेऊन वाहोली गाव, मांजर्ली, दहागाव, एरंजाड, बदलापूर, पालेगाव, नेवाळी नाका, शिळ डायघर किंवा पत्रीपूल येथून इच्छित स्थळी जातील.



## बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी "कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक आणि रोजगार"

### - ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : बुलेट ट्रेन (हाय स्पीड रेल्वे) या मार्गावरील ठाण्यातील स्टेशन परिसर विकास करताना २५ टक्क्याहून अधिक जागेवर हरित क्षेत्र राखले जाणार आहे. ठाणे हाय स्पीड स्टेशन भारतातील पहिले मल्टीमोडल इंटीग्रेटेड स्टेशन असल्यामुळे सामान्य नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सार्वजनिक वाहतूकीच्या सुविधा उपलब्ध होतील. तसेच या स्टेशन परिसराचा नियोजनबद्ध विकास झाल्याने कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक येईल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल, असे मत ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी चर्चासत्र कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

हाय स्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) प्रकल्पामुळे आर्थिक गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढणार आहेत. बुलेट ट्रेनच्या ठाणे स्टेशनमध्ये, बुलेट ट्रेन, रेल्वे, मेट्रो, अंतर्गत मेट्रो, बस, जेट्टी (जलमार्ग) कॅब-रिक्षा स्थानके तसेच लगतचे सर्व मोठे महामार्ग व विशेष रस्त्याद्वारे विमानतळही जोडण्यात येणार आहे. ठाण्यात सर्व वाहतूक सुविधांचे जंक्शन तयार होणार आहे. शहराचे आमूलाग्र परिवर्तन करण्याची क्षमता असलेल्या, राज्यातील हाय स्पीड रेल्वे स्टेशन परिसराच्या विकासात सर्व घटकांनी सक्रीय सहभाग घेण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने स्टेशन परिसर विकासाची दिशा निश्चित व्हावी यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, गुजरात सरकार, जपान सरकार, स्थानिक महापालिका, संबंधित घटकांचे प्रतिनिधी यांच्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २६ सप्टेंबर रोजी ठाण्यात करण्यात आले होते. केंद्रीय गृह निर्माण आणि नागरी विकास मंत्रालय, रेल्वे मंत्रालय, नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांच्या नेतृत्वात शहर विकास विभागाने या चर्चासत्राचे संयोजन केले होते. त्यात, केंद्र सरकारची नगर नियोजन संघटना, जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका), नगर रचना आणि मूल्यांकन विभाग, ठाणे, कल्याण डोंबिवली आणि वसई - विरार महानगरपालिका यांचे प्रतिनिधी तसेच बांधकाम व्यावसायिक, आर्किटेक्ट, विविध संघटना यांचे प्रतिनिधी या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

मुंबई- अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पामध्ये एकूण १२ स्टेशन आहेत. त्यापैकी ४ स्टेशने ( मुंबई, ठाणे, विरार, बोईसर) महाराष्ट्रातील आहेत. या स्टेशन परिसरांचा नियोजनपूर्वक विकास करणे प्रस्तावित आहे. यासाठी भारत सरकार, जपान सरकार व राज्य सरकार यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. यापैकी, ठाणे व विरार स्टेशन परिसराचा नियोजनबद्ध विकास आराखडा स्थानिक महापालिका, जपान सरकारचे प्रतिनिधी जायका व नगरविकास विभाग संयुक्तपणे करत आहे. या प्रकियेत नियोजनामध्ये सर्व भागधारक घटकांचा समावेश करून त्यांना नेमक्या कोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत हे जाणून घेण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रात सर्व भागधारकांनी सहभागी होऊन या प्रकल्पाची आखणी समजून घ्यावी. त्यात सरकारला अपेक्षित काय आहे, नागरिकांना कोणकोणत्या सुविधा देता येतील, यावर विचार करावा. केंद्र सरकारचा हा संवाद उपक्रम संपूर्ण प्रकल्प क्षेत्रात होणार आहे. त्याची सुरुवात ठाणे आणि विरार येथील स्टेशनच्या परिसर विकास चर्चेने होत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृह आणि नागरी विकास मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव डी. थारा यांनी दृश्य प्रणालीद्वारे केले.

## लाडकी बहीण योजनेसाठी शासन स्तरावर पुनर्पडताळणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यातील महिलांच्या चांगलीच पसंतीस उतरली आहे. महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार उघडकीस आला आहे. ही योजना केवळ गरजू आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत महिलांसाठी आहे, तरीही हजारो सरकारी कर्मचाऱ्यांनी त्याचा फायदा घेतला आहे, ही धक्कादायक बाब आहे. त्यामुळे आता शासन स्तरावर याची पुनर्पडताळणी केली जात आहे. सध्या अशा लाभार्थ्यांची, सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या 8000 पेक्षा जास्त झाली आहे आणि सरकारने त्या सर्वांकडून पैसे वसूल करण्यासाठी पावले उचलली आहेत. वित्त विभागाने संबंधित विभागांना कर्मचाऱ्यांच्या पगारातून अंदाजे 15 कोटी रुपये वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. लाडकी बहीण योजनेचा फायदा 2.5 लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या महिलांना होती. सरकारी कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र नाहीत. तरीही, अनेक कर्मचाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून सरकारची फसवणूक केली. महिला आणि बाल कल्याण विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने अशा कर्मचाऱ्यांची यादी तयार केली आहे.

यातील महत्त्वाची बाब म्हणजे, केवळ सक्रिय कर्मचारीच नाही तर निवृत्त कर्मचाऱ्यांनाही 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळत आहे. त्यामुळे महिला आणि बाल कल्याण लाभार्थ्यांची यादी संबंधित विभागांना पाठवेल आणि पेन्शन विभागालाही पत्राद्वारे कळवले जाईल, अशी माहिती समोर आली आहे.

**विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर केली योजना**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी 'लाडकी बहीण' योजना जाहीर करण्यात आली होती. त्यासाठी 3600 कोटींची तरतूद करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत बनावट लाभार्थी आढळल्यानंतर सरकारने सखोल चौकशी सुरू केली आहे. यामुळे, ही योजना खरोखर गरजू महिलांपर्यंतच पोहोचावी यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक आणि इतर विविध विभागातील महिला कर्मचारी तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही रक्कम या कर्मचाऱ्यांचा पगार किंवा पेन्शनमधून हप्त्यांमध्ये किंवा एकरकमी वसूल केली जाणार आहे.

## कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणे रोखण्यासाठी महसूल आणि भूमी अभिलेख विभागाकडून सर्वेक्षण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील सरकारी जागांवर अतिक्रमणे, सरकारी जागांचा दुरुपयोग केले जाण्याचे प्रकार समोर येत असून, हे रोखण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सरकारी जागांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

'जीआयएस' प्रणाली आधारित 'गव्हर्नमेंट लँड डेटा बँक' तयार करण्यात येत असून, ती गुगल अर्थसोबत जोडली जाणार आहे. यामुळे सरकारी जागांवरील अतिक्रमणे, विकासकामे यांची माहिती तत्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे. शहापूर आणि भिवंडी तालुक्यांत या दृष्टीने महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभागाच्या माध्यमातून कामे सुरू करण्यात आल्याची




माहिती ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी गुरुवारी जिल्ह्यातील विकास प्रकल्पांच्या अनुषंगाने पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शहरातील वाहतूककोंडी, अतिक्रमणे, पर्यावरणाचा ऱ्हास , पर्यटन विकास आणि विविध विकासकामांवर त्यांनी व्यापक चर्चा केली. यावेळी त्यांनी प्रशासनाकडून सरकारी जागेतील अतिक्रमणे रोखण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. महापालिकांमध्ये सुरू असलेल्या अतिक्रमणांच्या अनुषंगाने त्यांच्याशी पत्रव्यवहार करून अतिक्रमणे रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही जिल्हाधिकारी पांचाळ यांनी स्पष्ट केले. कल्याण-डोंबिवलीतील ६५ अनधिकृत बांधकामांपैकी पाच जागा सरकारी मालकीच्या असून, तेथे अटी शर्थींचा भंग झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्यानुसार कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

**जिल्ह्याचा पर्यटन आराखडा**

ठाणे जिल्ह्यातील ३९ पर्यटनस्थळांचा आराखडा तयार करण्यात आला असून, तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय मलंगगडावरील फ्युनिक्युलर ट्रॉली कार्यान्वित करणे, माळशेज घाटात काचेचा स्कायवॉक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबरोबरच माहुली, येऊर, थितबी या ठिकाणी वन विभागाच्या माध्यमातून पर्यटनस्थळांच्या विकासाचे प्रयोजन आहे. जिल्हा नियोजन, वन विभाग आणि पर्यटन विभागाकडून या दृष्टीने निधी मिळवण्यात येणार आहे.जिल्ह्यातील ठाणे, नवी मुंबई आणि वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय असे तीन पोलिस आयुक्तालय, ठाणे ग्रामीण पोलिस अधीक्षक क्षेत्र, महामार्ग पोलिस प्रशासन, याशिवाय महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए, एमएसआरडीसी या नियोजन प्राधिकरणांशी समन्वय साधण्यात येणार असल्याचे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्पष्ट केले.

## भिवंडीत मोबाईल कंपन्यांचे अनधिकृत टॉवर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी महापालिका क्षेत्रात मोबाईल कंपन्यांनी अनधिकृत टॉवर उभारल्याने प्रशासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाल्याचे वास्तव समोर आले आहे. शहरात २१४ अनधिकृत मोबाईल टॉवर उभारल्याचे माहिती अधिकारात उघड झाले आहे. विशेष म्हणजे कर मूल्यांकन व वसुली विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित कारभारामुळे उत्पन्नाला मोठा फटका बसत असून, शहर विकासासाठी आवश्यक निधी अडचणीत आला आहे.

आर्थिक डबघाईला आलेल्या भिवंडी महापालिकेत निधीअभावी अनेक विकासकामे ठप्प झाली आहेत. कामगारांची देणी पालिकेकडून थकवली जात असताना, आता विविध कंपन्यांना थेट अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यास मोकळीक दिली जात असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. हे टॉवर इमारतींच्या टेरेसवर कोणतीही परवानगी न घेता, सुरक्षिततेच्या नियमांकडे कानाडोळा करून उभारले आहेत. यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. टॉवरमधून निघणाऱ्या रेडिएशनमुळे आरोग्यावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.








# खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी दिली रासरंग नवरात्रोत्सवाला भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सांस्कृतिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवलीत यंदा पुन्हा एकदा नवरात्रोत्सवाचा जल्लोष अवतरला आहे. डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित “रासरंग - २०२५” हा नवरात्र महोत्सव डोंबिवलीतील डी.एन.सी. शाळेच्या मैदानावर दिमाखात सुरू आहे. सातव्या वर्षात पदार्पण करणारा हा सोहळा यंदाही अधिक भव्यतेने, कलात्मकतेने आणि उत्साहाने डोंबिवलीकरांसमोर साकारत आहे. या उत्सवाला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी शुक्रवारी हजेरी लावली आणि सर्वांना नवरात्री उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

२२ सप्टेंबरपासून सुरू झालेला हा उत्सव आजवरच्या पाच दिवसांत डोंबिवलीकरांसाठी खास आकर्षण ठरला आहे. दररोज हजारो गरबा रसिक पारंपरिक वेशभूषेत येऊन गरब्याचा, दांडियाचा आणि सांस्कृतिक वातावरणाचा मनसोक्त आनंद घेत आहेत. रंगीबेरंगी वेशभूषा, दांडिया, पारंपरिकतेला साजेशी रचना आणि त्यावर थिरकणारे पाय यामुळे संपूर्ण मैदान नवरात्रीच्या उत्साहात न्हाऊन निघाले आहे.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले आहेत दांडिया किंग नैतिक नागदा. त्यांच्या जल्लोषमय सूरांनी आणि तालबद्ध वाद्यसंगीताने मैदानात उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या मनाला आनंद देत आहे. तरुणाईसोबतच वयोवृद्ध नागरिकही त्यांच्या सादरीकरणावर थिरकत असल्याचे चित्र गेल्या काही दिवसांत पाहायला मिळाले. कुटुंबासह आलेले नागरिक, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनीच या गरब्यात सहभाग नोंदवत नवरात्रीच्या पवित्र वातावरणात रंग भरला आहे.

यंदाच्या रासरंग महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे सांस्कृतिक विविधतेचे दर्शन. नेत्रदीपक मंच, लखलखीत प्रकाशयोजना, गरब्याचा आनंद घेण्यासाठी प्रशस्त मैदान आणि प्रत्येक दिवशी वाढणारा नागरिकांचा सहभाग यामुळे हा सोहळा अधिकच वैभवशाली ठरत आहे. याशिवाय विविध मान्यवर, गायक यांच्या उपस्थितीमुळेही महोत्सवाची शान अधिक खुलली आहे.




### सातवा दिवस : सातवी माळ

# आजची देवी : श्री कालरात्री



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

## श्री कालरात्री

माता कालरात्रीची ही व्रत कथा वाचून भय तर नष्ट होतेच पण गरज पडल्यास शत्रूला सामोरे जाण्याची भीतीही वाटत नाही. कालरात्री माता नेहमी सत्य आणि न्यायाचे पालन करण्याचा संदेश देते.

एकेकाळी रक्तबीज नावाच्या राक्षसाची दहशत होती. रक्तबीजला वरदान मिळाले की त्याच्या शरीरातून पडणाऱ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाने एका नव्या राक्षसाला जन्म दिला. हे वरदान त्यांना अमर करत होते. देव आणि मानव सर्वांना त्याच्या क्रूरतेचा त्रास झाला. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी देवतांनी भगवान शंकराची मदत मागितली. केवळ माता पार्वतीच या राक्षसाचा नाश करू शकते.

भगवान शिव म्हणाले, देवांनी पार्वतीची प्रार्थना केली. रक्तबीज संपवण्यासाठी माता पार्वतीने माता कालरात्रीची निर्मिती केली. माता कालरात्रीला रक्तबीजेचा सामना करावा लागला आणि युद्ध सुरू झाले. रक्तबीजला मारणे जवळजवळ अशक्य होते कारण त्याच्या रक्ताचा प्रत्येक थेंब नवीन राक्षसाला जन्म देत होता, परंतु आई कालरात्रीने एक योजना आखली. त्याने रक्तबीजेवर हल्ला केला आणि त्याच्या शरीरातून रक्तस्राव सुरू होताच त्याने सर्व रक्त तोंडाने पिऊन टाकले. अशाप्रकारे रक्तबीज अधिक राक्षसांना जन्म देऊ शकली नाही आणि शेवटी कालरात्री मातेने त्याचा वध केला. अशा प्रकारे माता कालरात्रीने रक्तबीजच्या दहशतीतून जगाला मुक्त केले.

मॉं कालरात्रीच्या पूजेची पद्धत

नवरात्रीच्या सातव्या दिवशी सकाळी स्नान करून पूजा करावी. या दिवशी मॉं कालरात्रीची पूजा करा. सर्व प्रथम कालरात्रीला गंगाजलाने स्नान करावे. त्यानंतर त्यांना अखंड फुले, फळे, कुंकुम, धूप, दीप, सुगंध, नैवेद्य इत्यादी अर्पण करून त्यांची पूजा करावी. यावेळी मॉं कालरात्रीच्या मंत्रांचा जप करा. त्यानंतर कालरात्रीला गुळाचा नैवेद्य दाखवावा. मॉं कालरात्रीच्या आरतीने पूजेची सांगता करा.

### जिल्हा परिषद शाळा दोनघर येथे

# शिक्षण परिषद संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण** : 27 सप्टेंबर 2025 रोजी नडगाव केंद्राची शैक्षणिक वर्ष 2025- 26 या वर्षातील तिसरी शिक्षण परिषद निसर्गाच्या सानिध्यात *निसर्गरम्यठिकाणी आणि वनराईच्या कुशीत जिल्हा परिषद शाळा दोनघर येथे उत्साहात संपन्न झाली. शिक्षण परिषदेचे अध्यक्ष पद सन्माननीय गुरुनाथ मडके सर मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा शिरगाव यांनी भूषवले. नडगाव शाळेच्या मुख्याध्यापिका मृणाल भोईर. मानीचापाडा शाळेचे मुख्याध्यापक ,सुनील पाटील सर कामतवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका कांता मडके सर्व शाळांचे मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. शिक्षण परिषदेच्या औचित्य साधून नडगाव केंद्रातील शिष्यवृत्ती नवोदय परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला यामध्ये दोन नगर शाळेची विद्यार्थिनी कोमल भला, सुजाता दत्ता वाख शाळा दोनघर , भूमिका विठ्ठल भला शाळा दोनघर दुर्वा दांडकर शाळा शिरगाव त्याचबरोबर त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षकांचा देखील सन्मान करण्यात आला. यामध्ये महेश मुकुंद धिरडे शाळा शिरगाव, प्रदीप वाळकू चव्हाण, शाळा दोनघर, कविता हरेश भागवत, शाळा दोनघर,यांचा सन्मान करण्यात आला व मंथन परीक्षेमध्ये विद्यार्थी गुणवत्ता यादीत आणल्याबद्दल पूजा परदेशी शाळा शिरगाव, प्रज्ञा म्हसकर शाळा नडगाव यांचा देखील सन्मान करण्यात आला. शिक्षण परिषदेमध्ये सुनील भोईर सर यांनी स्वच्छता मॉनिटर, या विषयावर प्रगल्भ आणि कृतीयुक्त मार्गदर्शन केलं, भाषा पेटी संदर्भात मार्गदर्शन करत असताना मृणाल भोईर मॅडम यांनी विस्तृत अशी माहिती दिली. तर पूजा परदेशी यांनी इन्स्पायर अवार्ड बद्दल माहिती करून दिली. कांता मडके यांनी विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे अध्ययन प्रक्रिया समजावून सांगितली. एक उल्लेखनीय आणि अविस्मरणीय अशी शिक्षण परिषद दोनघर शाळेत संपन्न झाली म्हणून सर्वांनी कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समिती तसेच महिला मंडळ दोन घर यांनी मोलाचे सहकार्य केले. सर्व उपस्थितांचे आभार सुनील पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे संपूर्ण छायाचित्रण सुनील भोईर यांनी केले. सर्वांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला.

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी



आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळयांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# इमारतीच्या 11 व्या मजल्यावरून उडी मारत तरुणाची आत्महत्या



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली पश्चिमेतील सुदामा इमारतीमध्ये राहणाऱ्या ऋषिकेश परब (२२) या तरुणाने प्रेमप्रकरणातून त्रस्त होत अकराव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. शनिवारी सकाळी ८ वाजल्यापासून दुपारी १२ वाजेपर्यंत त्याने आत्महत्येचा नाट्यमय प्रयत्न केला. या काळात पोलिस तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याला समजावून वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने इमारतीवरून उडी मारली आणि त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेदरम्यान इमारतीवरून खाली पडतानाचा प्रसंग मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

# किसळ-पारगाव ग्रामपंचायतीत आदी कर्मयोगी केंद्राचे उत्साहात उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत किसळ-पारगाव ग्रामपंचायत क्षेत्रात आदी कर्मयोगी केंद्राचे उद्घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या सोहळ्याला ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनापूर्वी ग्रामपंचायत क्षेत्रातील दोन्ही गावांत शिवार फेरी काढण्यात आली. या फेरीदरम्यान आदिवासी विकास विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली तसेच ग्रामसभेच्या महत्त्वाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

या केंद्राचे उद्घाटन केंद्र सरकारच्या जनजाती कार्य मंत्रालय कार्यालय सचिव सूर्याश निगम व सरपंच डॉ कविता वरे-भालके यांनी संयुक्तपणे केले. या समारंभास केंद्र सरकारच्या जनजाती कार्य मंत्रालय मधील अधिकारी, प्रकल्प कार्यालय शहापूरचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरविंद जाधव, पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी लोहकरे आणि पेसा तालुका समन्वयक प्रल्हाद लोकडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन ग्रामपंचायत सरपंच डॉ. कविता वरे- भालके यांनी केले, तर सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्या वैष्णवी पडवळ यांनी केले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य सुनिल पडवळ, अनंत पारधी, भारती पारधी तसेच आशा स्वयंसेवीका हिरा दवने-पडवळ, अंगणवाडी सेविका ताराबाई भेरे, कविता जमदरे, सुरेखा दवणे, सी.आर.पी. सुनिता भालके, रत्ना पडवळ व महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या केंद्रामुळे ग्रामविकास आणि जनजागृतीस नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# वर्तकनगर माध्यमिक विद्यालयात शारदोत्सव संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



## विद्यार्थ्यांना मिळाली संगीतमय मेजवानी

**ठाणे** : ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या वर्तकनगर माध्यमिक विद्यालय, ठाणे येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही शुक्रवार दि.26 सप्टेबर 2025 रोजी दुपार अधिवेशनाचे इ.5 वी ते 7 वीच्या विद्यार्थ्यांसाठी ब्राम्हण शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा नमिता सोमण व चिटणीस ॲड. केदार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली 'शारदोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नूतन विद्यामंदिर मानखुर्द सहशिक्षक दीपक तुळशीराम कदम यांनी आनंददायी कृतीयुक्त गाण्यांच्या माध्यमातून लहान मुलांचे भाव विश्व ओळखून नादमधुर कविता, गाणी, साभिनय मुलात मुल होवून सादर केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शारदोत्सवाच्या निमित्ताने संगीतमय मेजवानी मिळाली. प्रास्ताविक आणि परिचय मुख्याध्यापक आव्हाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुनिता सूर्यवंशी तर कार्यक्रमाच्या प्रमुख मानसी सूर्यवंशी यांनी आभार मानले. विद्यालयातील सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला.







**मेष**
तुमच्या बजेटची काळजी घ्या. जवळच्या मित्राशी किंवा नातेवाईकाशी काही मतभेद होऊ शकतात. इतरांच्या रागापुढे तुमची शक्ती वाया घालवू नका.

**वृषभ**
वडिलधाऱ्यांचा आणि ज्येष्ठांचा आदर कमी होणार नाही. जवळची नाती बिघडण्यापासून वाचवण्यासाठी हार मानावी लागली तर लाज वाटू नका.

**मिथुन**
काही प्रलंबित पेमेंट प्राप्त होऊ शकते किंवा उत्पन्नाचे काही थांबलेले स्त्रोत देखील पुन्हा सुरू होऊ शकतात. गरजूला मदत केल्याने आनंद मिळेल.

**कर्क**
तुम्ही दूरवरच्या व्यावसायिक पक्षांशी तुमचे संबंध दृढ करा. त्यांच्यामार्फत तुम्ही महत्त्वाचे करार मिळवू शकता.नोकरीसाठी लाभाचे संकेत आहेत.

**सिंह**
गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला व्यस्तता आज कमी होईल. आज आपण स्वतःसाठीही थोडा वेळ काढू. मानसिक शांती मिळेल.

**कन्या**
जे राजकारणी क्षेत्राशी निगडित आहेत, त्यांचा मान-सन्मान वाढेल आणि त्यांना पक्षातही मोठे पद मिळू शकेल. भावनेच्या भरात चुकीचा निर्णय घेऊ शकता .

**तूळ**
नम्र स्वभावामुळे घरात आणि समाजात तुमची प्रशंसा होईल. नात्यात गोडवा आणण्यासाठी नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करून संवाद गरजेचा आहे.

**वृश्चिक**
उत्पन्न वाढू शकते. आज तुमचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तुम्हाला प्रत्येक परिस्थितीत आनंदी कसे राहायचे हे दर्शवेल.

**धनु**
तुम्हाला काही विशेष यश प्राप्त होणार आहे.म्ही तुमच्या कौटुंबिक वातावरण आणि कार्यक्षेत्रात समन्वय राखला पाहिजे, तुम्ही आनंदी व्हाल.

**मकर**
मनापासून मन लावून काम करा.मेहनतीचे फळ न मिळाल्याने आज कामाच्या ठिकाणी काहीसे दुःख होईल. वरिष्ठ व्यक्तीचा सल्ला घ्या.

**कुंभ**
गुंतवणुकीसाठी काळ अतिशय अनुकूल आहे. तसेच घरातील बदलांशी संबंधित विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहे. व्यवसायात फायदा होईल.

**मीन**
तुमची जीवनशैली आणि बोलण्याची पद्धत लोकांना तुमच्याकडे आकर्षित करेल. घरातील काही शुभ कार्य पूर्ण करण्यासाठी योजना बनतील.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## मत चोरीच्या जनजागृतीसाठी कल्याणमध्ये युवक काँग्रेसच्या वतीने सह्यांची मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिम येथे कल्याण डोंबिवली युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जपजीत सिंग माटा यांच्या वतीने सध्या देशात मोदी सरकार कडून होणाऱ्या "मत चोरी" या विषयावर जनजागृतीसाठी स्वाक्षरी मोहिम आयोजित करण्यात आली होती. हि स्वाक्षरी मोहिम युवक काँग्रेसच्या कोकण विभागाच्या प्रभारी शांभवी शुक्ला यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला होता. या स्वाक्षरी मोहिमेत कल्याण शहरातील स्थानिक नागरिकांनी लॉलीपॉप आणि गाजर दाखवून तसेच आपल्या सह्या करून मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला. कल्याण युवक काँग्रेसतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ह्या स्वाक्षरी मोहिमेत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस मेहेर चौपाने, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे, महिला जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी, माजी नगरसेवक नवीन सिंग, महिला काँग्रेसच्या वैशाली वाघ, कोमल भोसले तसेच युवक काँग्रेसचे विमलेश विश्वकर्मा, विनू जाधव, शोएब शेख, श्रेयस सिंग, अंशुल शिंदे, राजरत्न नेटकर, हारून खान, अंगद, संदेश, आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## पडघा सेवा सहकारी सोसायटीच्या वार्षिक सभेत विविध विषयांवर चर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा विभागातील १५ गावांतील ६८८ शेतकरी सभासद संख्या असलेल्या पडघा गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

पडघा सोसायटीची ही सभा सभापती रमेश रामचंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयासंदर्भात सोसायटीच्या नवीन बांधकाम इमारतीत शुक्रवारी घेण्यात आली यावेळी मागील सभेचे प्रोसेडींग, ताळेबंद, नफा तोटा पत्रक, अदांजपत्रक वाचून सभेमध्ये मंजुरी घेण्यात आली.यावेळी उपस्थीत सभासदांनी कर्जवाटप, बोनस, संचालक शैक्षणीक दौरा तरतुद, थकबाकीदारांची यादी छापणे, लेखापरीक्षकाचां अहवाल वार्षिक अहवालात प्रसिद्ध करणे, सभासद शेतकऱ्यांना लाभांश देणे आदी विषयासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. यावेळी सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची अध्यक्ष रमेश पाटील मुख्य सचीव ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.यावेळी उपसभापती सुरेश पाटोळे, संचालक दत्तात्रेय पाटोळे, श्रीकांत गायकर, गुरूनाथ मते, रामचंद्र म्हात्रे, देवीदास पाटील, राजाराम जाधव, दिपक जाधव, दीलीप पाटील, भारती घावट, अंजना पाटील, मनोहर पाटील, तज्ञ संचालक ज्ञानेश्वर हुकमाळी उपस्थित होते. तर यावेळी सभासद अजय पाटील, अशोक गायकवाड, अरुण पाटोळे यांनी चर्चेत सहभाग घेतला यावेळी पडघा टीडीसी बँकेचे व्यवस्थापक चंद्रशेखर दोंदे सहसचिव शितल कशीवले व ७५ शेतकरी सभासद उपस्थित होते सभेचे सुत्रसंचालन सचिव ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केले.

## शाश्वत सुरक्षित शहर घडविण्यात गृहसंकुलांची भूमिका महत्त्वाची

**– केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल**



### केडीएमसीतर्फे आयोजित चर्चासत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : "स्मार्ट शहर म्हणजे केवळ तंत्रज्ञान वा पायाभूत सुविधा नव्हे; तर त्यामध्ये राहणारे नागरिक स्मार्ट असतील तेव्हाच ते शहर खऱ्या अर्थाने स्मार्ट होते. शहर शाश्वत आणि सुरक्षित नसेल, तर त्याची प्रगती शक्य नाही," असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. महापालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत - यांत्रिकी) प्रशांत भागवत यांच्या पुढाकाराने कल्याण पश्चिमेतील मोहन अल्टीझा या गृहसंकुलात प्रथमच 'शाश्वत-सुरक्षित इमारत' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन आज सकाळी करण्यात आले त्यावेळी बोलताना आयुक्त अभिनव गोयल यांनी हे प्रतिपादन केले. या चर्चासत्रात उपआयुक्त संजय जाधव, प्रसाद बोरकर, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत - यांत्रिकी) प्रशांत भागवत, महापालिकेचे स्वच्छता ब्रँड ॲम्बेसेडर डॉ. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ, अशोक घोडे, शैलेश मळेकर, जितेंद्र शिंदे, सहा. आयुक्त प्रिती गाडे, धनंजय थोरात, मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी, माजी नगरसेवक सुनील वायले, सोसायटीचे अध्यक्ष संजय शहा आणि सचिव मुकेश उत्तमानी यांच्यासह कल्याण-डोंबिवलीतील विविध सोसायट्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पाणी व्यवस्थापन, सौरऊर्जा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पाण्याचा पुनर्वापर, वृक्ष लागवड, विद्युत सुरक्षा, घनकचरा व्यवस्थापन आणि अग्निसुरक्षा या महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या मुद्द्यांवर प्रभावीपणे काम करणाऱ्या सोसायट्यांना महापालिकेच्या वतीने मानांकन आणि इतर प्रोत्साहनपर फायदे देण्याचा विचार सुरू असल्याचे आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी स्पष्ट केले मात्र नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सोसायट्यांना सुरुवातीला समज देण्यात येईल आणि भविष्यात आर्थिक दंड लावला जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

"नागरिकांच्या छोट्या-छोट्या सवयींमुळे शहरात मोठा बदल घडवून आणता येतो. प्रत्येक सोसायटीपर्यंत हा उपक्रम पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे." असेही ते पुढे म्हणाले. कार्यक्रमापूर्वी आयुक्त अभिनव गोयल यांनी मोहन अल्टीझा सोसायटीतील घनकचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा प्रकल्प व सांडपाणी प्रक्रिया केंद्राची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

## केळंबा देवीच्या नवरात्र उत्सवाला भाविकांची अलोट गर्दी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता







### पेण येथील जागृत आणि स्वयंभू देवस्थान असलेल्या केळंबा मातेचा नवरात्र उत्सव अतिशय भक्तीभावाने सुरु असून सर्व गावकरी बंधू सेवेसाठी तत्पर

**पेण** : पेण तालुक्यातील खरोशी येथील केळंबा देवीचा नवरात्र उत्सव सुरू असून या माऊलीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविकांनी दर्शन घेतला असून आज तर सहाव्या माळीवर भाविकांची अलोट गर्दी पहावयास मिळाली.

नवसाला पावणारी हाकेला धावणारी खरोशी पेण येथील जागृत आणि स्वयंभू देवस्थान असलेल्या केळंबा मातेचा नवरात्र उत्सव अतिशय भक्तीभावाने सुरु असून सर्व गावकरी बंधू सेवेसाठी तत्पर आहेत.

चार खांबावर उभे असलेले हे मंदिर पाहण्यासाठी रोजचा रोज हजारो नागरिकांची रिघच आपल्याला पहावयास मिळत आहे. आज शनिवार आणि उद्या रविवार तर गर्दीचा महापुर आपल्याला पहावयास मिळणार. पेण पनवेल उरण कर्जत खालापूर कल्याण डोंबिवली जव्हार भिवंडी ठाणे अहिल्यानगर पुणे मुंबई ठाणे यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक रोजच्या रोज माउलीच्या दर्शनासाठी येत असल्याने गर्दीच गर्दी पहावयास मिळत आहे. गावं पंचांच्या मार्गदर्शनाखाली माऊलीच्या दर्शनासाठी आलेल्या प्रत्येक भाविकाला मनोभावे दर्शन घेता यावे यासाठी सर्व गावकरी बंधू व्यवस्थेमध्ये व्यस्त असलेले पहावयास मिळत आहे यावर्षी नवनाथ मित्र मंडळ वरची आळी यांची पाळी असल्यामुळे सर्व पाटील ठाकूर म्हात्रे भाऊबंद अतिशय मेहनतीने माऊलीची सेवा करताना दिसत आहेत त्याचबरोबर गावातील घरत पाटील माळी भोंडकर गावंड यासह सर्व गावकरी रात्रीचा पहारा आणि पार्किंगची व्यवस्था उत्तमपणे पाहत असलेले आपणास पहावयास मिळत आहे. आलेला भाविक मनोभावे दर्शन घेऊन माय माऊलीच्या मंदिरामध्ये नृत्य आणि गाण्याचा आनंद घेतल्याशिवाय पुढे सरकत नाहीत डीजेच्या तालावर नृत्य गाण्याचा आनंद घेऊन अनेकांचे मन भरून आलेले पहावयास मिळत आहे.

## पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते पेण पोलीस चौकीचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





**पेण** : पेण एसटी बसस्थानक येथे उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आले.

बसस्थानकात वारंवार होणाऱ्या चोऱ्या आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसावा, तसेच नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी ही चौकी उभारण्यात आली या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचा यावेळी पोलीस विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे राजू पिचिका यांच्या सौजन्याने चौकी उभारणीसाठी मोठे सहकार्य लाभल्याने त्यांचा रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला पेण पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, दादर पोलीस निरीक्षक संजय ब्राह्मणे, पोलीस उपनिरीक्षक निलेश राजपूत, रायगड एसटी विभाग नियंत्रक, एसटी आगार प्रमुख अपर्णा वर्तक, पेण नगरपालिका मुख्यधिकारी जीवन पाटील आदी मान्यवरांसह शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील, स्थानिक नागरिक पत्रकार पोलिस अधिकारी अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते,. या चौकीच्या स्थापनेमुळे पेण बसस्थानक परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल असा विश्वास, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

## सेवा पंधरवडा अंतर्गत भाजपची खर्डीत चित्रकला स्पर्धा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात सेवा पंधरवडा साजरा होत आहे. सेवा पंधरवडाचे औचित्य साधून खर्डी भाजपच्या वतीने खर्डीतील जिवनदीप महाविद्यालयातील 11 वी 12 च्या विद्यार्थांसाठी 'विकसित भारत'या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या चित्रकला स्पर्धेत 104 विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. आपला भारत भविष्यात कसा असेल ह्या संकल्पनेवर 'विकसित भारत'या विषयावर विध्यार्थ्यांनी सुरेख चित्र रेखाटून आपले मत चित्राद्वारे व्यक्त केले.या स्पर्धेत यशस्वी विशे(प्रथम),यत्रिका पातकर(द्वितीय),प्रतीक मोकाशी(तृतीय) व स्नेहल सदगीर (उतेजनार्थ)यांनी चित्रकला स्पर्धेत प्राविण्य मिळवले.तर 3रीत शिकणाऱ्या श्रीमयी गांगुर्डे हिने स्पर्धेत भाग घेतल्याने तिचा विशेष सत्कार करून सर्व विजेत्यांना रोख रक्कम बक्षीस स्वरूपात देण्यात आली.यावेळी भाजपचे ठाणे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र ढाकी, संस्थेचे अध्यक्ष व कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे,प्राचार्य कैलास कळकटे,भाजपचे संदेश भोईर,प्रकाश सांडे,प्रशांत खर्डीकर, विजय परदेशी, ओंकार सारंगधर, शशांक हरड आदी पदाधिकाऱ्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रभारी मुख्याध्यापकांने केला चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

### मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; वासनांध मुख्याध्यापकाला बेड्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली जवळील नीळजे ग्रामीण भागातील एका शाळेत प्रभारी मुख्याध्यापकाने सहा वर्षाच्या चिमुकलिवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात वासनांध मुख्याध्यापक महेंद्र खैरनार विरोधात गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

डोंबिवली ग्रामीण भागातील निळजे परिसरातील एका शाळेत संतापजनक बाब समोर आली आहे. एका मुख्याध्यापकाने सहा वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. दोन दिवसांपूर्वी त्याने हे कृत्य केले होते. घडल्या प्रकाराबाबत पीडित मुलीने कुटुंबियांना सांगताच कुटुंबीयांनी थेट मानपाडा पोलीस ठाणे गाठले. या वासनांध मुख्याध्यापकाविरोधात मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करत पोलिसांनी तात्काळ या मुख्याध्यापकाला अटक करण्यात आली आहे. महेंद्र खैरनार असे या नराधमाचे नाव असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिली.

### डोंबिवली ग्रामीण भागातील संतापजनक प्रकार

दरम्यान या आधी 2019 साली ग्रामस्थांनी या महेंद्र खैरनार हा मुलींसोबत गैरवर्तन करत असल्याची तक्रार गट विकास अधिकाऱ्याकडे करत त्याची बदली करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केलाय. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे.






## भिवंडीत महसूल विभागातर्फे कातकरी उत्थान कार्यक्रम संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





**भिवंडी** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आरोग्य तपासणी व दाखले वाटपासह विविध उपक्रम 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर 2025 राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती दिनापर्यंत महसूल विभागातर्फे राबविण्यात येत आहे सेवा पंधरवडा अंतर्गत भिवंडी तालुक्यात जिल्हाधिकारी ठाणे डॉ.श्रीकांत पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजीत खोले यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविणेत येत आहे. शुक्रवार(२५) रोजी क्रांतीकारक नाग्या महादू कातकरी यांच्या जयंतीचे औचित्य साधून तालुक्यातील पाये, नाईकपाडा येथे कातकरी उत्थान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात पंचक्रोशीतील कातकरी बांधव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रमजीवी संघटना यांच्या सहाय्याने पार पडलेल्या या मेळाव्यात महसूल विभाग, पंचायत समिती, तालुका आरोग्य अधिकारी,प्रकल्प अधिकारी, अदिवासी विभाग, कृषि अधिकारी व इतर शासकीय अधिकारी यांच्यावतीने विविध योजनांचा लाभ व दाखले वाटप कातकरी समाज बांधवांना करण्यात आले.यामध्ये जातीचे दाखले व उत्पन्न दाखले, जन्म नोंदीबाबत अर्ज,आधारकार्ड बाबत सुविधा व लाभ,मयताचे वारस पंचनामे, प्राथमिक आरोग्य केंद्र खारबांव मार्फत आरोग्य तपासणी,शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, लहान मुलांचे लसीकरण, गरोदर माता तपासणी मधुमेह व रक्तदाब तपासणी करण्यात आली अशी माहिती तहसीलदार अभिजीत खोले यांनी दिली आहे.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले )मुरबाड तालुका युवक अध्यक्षपदी सतीश गायकवाड यांची नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विजय मोरे यांच्या आदेशानुसार,ठाणे जिल्हा निरीक्षक मा.श्री.सुरेशजी बारशिंगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दि.24.9.2025रोजी ठाणे जिल्हा ग्रामीण आर.पी.आय (आ) अध्यक्ष संजयजी गायकवाड यांच्या हस्ते आयु.सतीश गायकवाड यांची मुरबाड तालुका आर.पी.आय (आ).युवक अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ )मध्ये युवकांना मोठ्या प्रमाणावर सामील करुन घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील व्यापक रिपब्लिकन पक्ष उभारणीसाठी प्रयत्न करावे अशी जबाबदारी सतीश गायकवाड यांना देण्यात आली.व सदर मुरबाड तालुका आर.पी आय युवक अध्यक्ष निवड ही 3 वर्षांसाठी करण्यात आली. या निवडीच्या वेळी ठाणे ज़िल्हा युवक अध्यक्ष तेजसजी जाधव. ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष अनिलजी धनगर.ठाणे जिल्हा युवक उपाध्यक्ष हरीश जी कांबळे.भरत अहिरे (देवगाव)व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# शहराची ओळख ही शहराच्या स्वच्छतेमुळे होत असते

## - केडीएमसी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहराची ओळख ही शहराच्या स्वच्छतेमुळे होत असून यामध्ये सफाई कर्मचारी यांचा मोलाचा वाटा असतो असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी काल केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या " *स्वच्छता ही सेवा-स्वच्छोत्सव २०२५"* या अभियानाच्या अनुषंगाने शुक्रवारी महापालिकेच्या प्र. के.आचार्य अत्रे रंगमंदिरात सफाई कर्मचारी तसेच सफाई मित्र यांच्याकरीता आयोजिलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

यावेळी महापालिकेचे मुख्य लेखापरीक्षक सुरेश बनसोडे, मुख्य लेखा अधिकारी दिग्विजय चव्हाण, अतिरिक्त शहर अभियंता जगदीश कोरे, महापालिका सचिव किशोर शेळके, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, उपायुक्त संजय जाधव, महापालिकेचा इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सुमारे ७०० ते ७५० सफाई कर्मचारी व सफाई मित्र तसेच एनजीओ, महाविद्यालयातील एनएसएसचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना तसेच पोस्ट ऑफिस मधील बचत योजना यांची माहिती उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या एकूण २७३ कर्मचारी यांची आभा कार्डासाठी व १३५ कर्मचारी यांची प्रधानमंत्री आयुषमान भारत कार्डासाठी नोंदणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामध्ये कार्यरतअसलेले एकूण ६० मुकादम व सफाई कर्मचारी तसेच विविध अभियानामध्ये महापालिकेस सहकार्य करणा-या एनजीओ व एनएसएस चे विद्यार्थी यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच एनजीओ सदस्य व महाविद्यालयीन विद्यार्थी यांचेमार्फत स्वच्छता शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमामध्ये महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी विशेषत: सफाई कर्मचारी यांचेमार्फत गायन व नृत्य कलेचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता मुख्य स्वच्छता अधिकारी आगस्तीन घुटे यांनी उपस्थितांचे आभार मानून केली. सफाई कर्मचाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

# महानगरपालिका क्षेत्रातील १५ गुणवतं शिक्षक 'शिक्षक गौरव पुरस्कार सन्मानित




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : आगामी पिढीसाठी घोकंपट्टी आणि पोपटपंची थांबवनू विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता रुजविणे अत्यावश्यक आहे. AI च्या युगात शिक्षणात मुलभूत बदल होतील आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील खरी मानवी क्षमता शोधून तिचा विकास घडवावा असे शिक्षक गुणगौरव सोहळ्याचे प्रमखु व्याख्याते ज्येष्ठ विचारवतं विवेक सावंत यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षण या विषयावर शिक्षकांना मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले.

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने राम गणेश गडकरी रंगायतन, ठाणे येथे दि.25 सप्टेंबर 2025 रोजी गुणवंत शिक्षकांच्या गुणगौरव सोहळयाचे आयोजन केले होते. यावेळी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील १५ गुणवतं शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल आणि तुळशीचे रोप देऊन शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयक्त-२ प्रशांत रोडे यांनी भूषविले. सतत चांगले कार्य करणारे पण पुरस्कार न मिळालेले शिक्षक देखील समाजासाठी तितकेच महत्त्वाचे आहेत असे सांगितले. तसेच आधनिुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काळानुरूप बदल स्वीकारणारे विद्यार्थी घडविण्याचे आवाहन करत पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनदंन केले.

ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी प्रास्ताविक करताना शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. गणुवतं शिक्षकांचा गौरव करणे हीच खरी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले. उपायुक्त(शिक्षण) सचिन सांगळे यांनी सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासावृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सभाधीटपणा व सर्जनशीलता वाढविण्याचे आवाहन देऊन सर्वांचे आभार मानले.

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे अधीक्षक विजय साळवे, गटाधिकारी संगिता बामणे, माध्यमिक विभाग अधीक्षक अनिता पवार व लेखाधिकारी चांगदेव वीर तसेच सर्व गटप्रमखु यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, ठाणे-पालघर शिक्षक पतपेढीचे माजी अध्यक्ष बाबाजी फापाळे, जगन्नाथ जाधव आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मनपा शाळा क्र. १२० चे शिक्षक सुरेश पाटील आणि सीआरसी केंद्र क्र. १० च्या केंद्र समन्वयक नीलिमा पाटील यांनी उत्तमरीत्या केले.

# अंबरनाथमध्ये स्वच्छता अभियान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : "स्वच्छता ही सेवा" या अभियानांतर्गत शहरामध्ये शासनाच्या आदेशा नुसार शहरामध्ये एक दिवस,एक तास एक साथ ही थीम घेऊन शहरातील संरक्षित ठिकाण प्राचीन कालीन ऐतिहासिक अंबरनाथ मंदिर परिसरा मध्ये स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. मा. मुख्याधिकारी श्री. उमाकांत गायकवाड, मा. उपमुख्याधिकारी श्री. उमेश राऊत व आरोग्य खाते प्रमुख श्री. राजेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले.

शनिवार दिनांक 27 सप्टेंबर 2025 रोजी ऐतिहासिक ठिकाणे व अध्यात्मिक ठिकाणे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानामध्ये स्वच्छता निरीक्षक श्री. आकेश म्हात्रे, श्री. महेश जाधव, श्री. राजू भांडे, श्री. नरेंद्र सावंत तसेच शिव मंदिर हजेरी शेड कामगार, मुकादम व अंबरनाथ गावचे नागरिक, स्वच्छता कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले. सामाजिक प्रतिनिधी देखील सामाजिकउपस्थित होते.

मोहीमेअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरामध्ये अत्यंत जुन्या साठलेलं कचरा साफ करून स्वच्छ परिसर भक्तगणांना खुला करण्यात आला. स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहर निर्माण करण्यासाठी नागरिकांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन सक्रिय योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# वेदांत कॉलेजमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:**वेदांत कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटतर्फे "एनएसएस फाऊंडेशन डे" तसेच "पोषण माह २०२५" आणि "स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान" अंतर्गत विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर बुधवारी आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या उपक्रमाचे नेतृत्व एनएसएस कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्राध्यापक मानसी दीक्षित आणि मुकेश अमृतकर यांनी सहकाऱ्यांच्या सोबतीने केले.

शिबिरात विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, इतर कर्मचारी आणि परिसरातील नागरिक यांची डोळ्यांची तपासणी, बॉडी मास इंडेक्स, फिजिओथेरपी, होमिओपॅथी सल्ला, स्त्रीरोग तपासणी करण्यात आली. याशिवाय रक्त तपासण्या (साखर व रक्तगट) मोफत तर इतर रक्त तपासण्या ५०% सवलतीत करण्यात आल्या. एकूण १८५ लाभार्थ्यांनी या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात आलेल्या तज्ज्ञांनी संतुलित आहार, साखर-मीठ-तेलाचे प्रमाण कमी करणे, स्त्री-पुरुष आरोग्य संवर्धन, व्यायामाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. या सूचना पोषण माह २०२५ च्या मुख्य विषयांशी सुसंगत होत्या.

# पडघ्यातील गिरीराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील ९५४ सभासद संख्या व २१ कोटी वार्षिक उलाढाल असलेल्या गिरीराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली.

पतसंस्थेचे अध्यक्ष अमोल विजय बिडवी यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पडघा येथील ग्रामसचीवालय सभागृहात गुरुवारी विविध विषयासंदर्भात घेण्यात आली. यावेळी मागील इतिवृत्त, नफा तोटा पत्रक,अंदाजपत्रकाचे वाचन करून मंजुरी घेण्यात आली. यावेळी वार्षिक अहवालातील वादग्रस्त मुद्दे काढून टाकणे, शाखाविस्तार, दिवाळी भेट,शेअर्स वाढवणे, कर्जदारांना असणाऱ्या जाचक अटीबाबत शासन दरबारी कैफियत मांडणे, सामाजिक उपक्रम निधी, कर्मचारी नेमणुक, बॅकींग तज्ञ संचालक निवड आदी विविध विषयासंदर्भात सभासदांनी प्रश्न उपस्थित केले.त्यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष अमोल बिडवी सचीव दीनेश गंधे यांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.तर यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गिरीष पटेल संचालक प्रविण बिडवी, अमित बिडवी, अँड.अजित कराडकर, रावसाहेब कुमावत, संजय बिडवी, स्नेहा तांबोळी, आंकाक्षा पातकर, बॅकींग तज्ञ संचालक संतोष काळे उपस्थित होते. तर यावेळी संस्थेचे सभासद शंशाक तांबोळी, संतोष सपाट, प्रशांत पातकर, संतोष तेलवणे, जगदीश तांबोळी यांनी उपस्थित राहुन चर्चेत सहभाग घेतला. सभेचे प्रस्ताविक संचालक रावसाहेब कुमावत यांनी तर सुत्रसंचालन व्यवस्थापक अनिकेत काळे यांनी केले. सभेची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# हवा प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छता जनजागृती रॅली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : आज शनिवारी सकाळी डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये हवा प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. औदुंबर कट्टा, सुदर्शननगर येथून या रॅलीस सुरवात झाली. या रॅली मध्ये ज्ञानमंदीर विद्या संकुल, के. रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि टिळकनगर कॉमर्स कॉलेज यांचे विद्यार्थी, एव्हरग्रीन सायकल प्रेमी ग्रुपच्या महिला वर्ग आणि निवासी मधील रहिवाशी हे सर्व पाऊस पडत असतानाही उपस्थित होते.

हवा प्रदूषण प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छता या संदर्भात घोषणा या रॅली मध्ये देण्यात आल्या तर काही लक्षवेधी फलक विद्यार्थ्यांचा हातात होते. यामुळे जनतेत या बद्दल मोठी जनजागृती करण्यात आली. या रॅली करीता जनतेकडूनही उत्तम प्रतिसाद मिळाला. एमआयडीसी निवासी मधील प्रमुख रस्त्यावरून फिरून ही रॅली ज्ञानमंदीर विद्यासंकुल येथे समाप्त झाली.

या रॅली मध्ये 150 विद्यार्थी आणि 75 रहिवाशांनी हजेरी लावली. सदर रॅलीचा समारोप प्रसंगी ज्ञानमंदीर शाळेचा मुख्याधपिका संगीता पाखले, पर्यावरण दक्षता मंचचे अनिल मोकल आणि रुपाली शाईवाले यांनी हवा प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छता याविषयी सर्वाना मार्गदर्शन केले.या रॅली मध्ये पर्यावरण दक्षता मंच तर्फे रुपाली शाईवाले, उज्वला केतकर, अनिल मोकल, प्राची कुलकर्णी, सुदर्शननगर निवासी संघ तर्फे सुरेखा जोशी, विजय सावंत, चंद्रशेखर राईलकर, विवेक पाटील, स्मिता फाटक, मिलापनगर रेसिडेन्स वेलफेअर असोसिएशन तर्फे वर्षा महाडिक, अरविंद टिकेकर, राजू नलावडे, माया परांजपे, डॉ मनोहर अकोले, अरुण जोशी, एव्हरग्रीन सायकल प्रेमीग्रुप तर्फे हर्षल सरोदे इत्यादीसह विद्यार्थी शिक्षक, रहिवाशी इत्यादी उपस्थित होते.

# सोबती संस्थेच्या वतीने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व दप्तराचे वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : वावोशी गावचे थोर समाजसेवक नाना टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित साधून पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना सोबती संस्थेच्या वतीने शालेय गणवेश व दप्तराचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी सोबतीचे संस्थापक अध्यक्ष अँड बापूसाहेब नेने समाजसेविका सौ शुभांगी नेने, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड मंगेश नेने सचिव डॉ नीता कदम वावोशी ग्रामपंचायत सरपंच अश्विनी शहासने ,उपसरपंच मयूर धारवे ग्रामपंचायत सदस्य पुनम भऊड रिया वालम भगवान शेटे विश्वास टिळक सोबती संघटनेच्या विजया दगडे प्रितेश दोषी ,धनश्री दोषी , ग्रामसेवक अंकुश पाटील के आर पाटील गोविंद वालम एलआयसी चे विकास अधिकारी सुमित जाधव अश्विनी गुरव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी शाळेतील किचनशेडचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अँड मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापिका सौ विद्या धनाजी घरत यांनी केले सुत्रसंचलन सौ.मानसी केदारे यांनी तर आभार सुनील पवार यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्या शेट्ये,आरती पाटील रंजना भऊड सुलभा राजपूरकर यांनी सहकार्य केले.




# तालुक्याचा फेरा वाचणार गावातच सातबारा दुरुस्त होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : महसूल विभागाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल पंधरवाडा आयोजित केला असून, त्यात गावोगावचा सातबारा अद्ययावतीकरण मोहीम राबवली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना तालुक्याला न जाता गावातच सातबारा दुरुस्त करता येईल. पंधरवड्यात जमीन, घर, वारस नोंदणी, फेरफार आदी महसूलशी संबंधित प्रलंबित अर्ज व दावेही तातडीने निकाली काढले जाणार आहेत. पाणंद रस्ते, सर्वांसाठी घरे, नाविन्यपूर्ण योजनाही राबवली जात आहे. ह्यासाठी अर्जाचा नमुना, जमिनीचा जुना सातबारा उतारा, हक्क पत्र/ खरेदी खत/विक्री खत, नोंदणी कार्यालयातील नोंद, वारस प्रमाणपत्र / आठ अ उतारा, जमिनीचा फेरफार अर्ज प्रत, ओळखपत्र : आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदार ओळखपत्र, रहिवासी दाखला आदी कागदपत्रे लागणार आहेत. मोहिमेदरम्यान गावात महसूल अधिकारी आल्यावर तक्रारी, अर्ज तत्काळ सादर करावेत. दुरुस्ती झाल्यानंतर शेतकऱ्यांनी मिळालेला सातबारा उतारा निट तपासून नोंदी अचूक आहेत का ते पाहायचे आहे. पंधरवड्यात जमीन, घर, वारस नोंदणी, फेरफार आधी महसूलशी संबंधित प्रलंबित अर्ज व दावेही तातडीने निकाली काढले जाणार आहेत. जिल्ह्यातील पाणंद व शिवार रस्ते पाहणी मोहीम दुसऱ्या टप्प्यात केली जाणार आहे. यासाठी महसूल विभागातर्फे आनंद रस्त्याची पाहणी सुरू झाली आहे. यासोबतच शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून घर बांधले आहेत, अशी घरे २०११ पूर्वीची असतील, तर ती अधिकृत करून दिली जाणार आहेत. सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत ही कार्यवाही होणार आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024